# बिलीफ बायोटेक, चिपरी.

Belief

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

मोबा. नं. 9850895072, 8275002072, 9850301072

## टिश्यू कल्चर केळी लागवडीसाठी शेतकऱ्यांना महत्वाच्या सूचना

### ✻ लागवडीची तयारी :-

केळीची लागवड करताना जमिनीची उभी – आडवी नांगरट होणे फार महत्वाचे आहे. नांगरट जमिनीत ओल असताना करु नये. नांगरटीनंतर जमिन तापू द्यावी जेणेकरुन वरचा एक फुटाचा थर पूर्णपणे वाळेल. नांगरटीपूर्वी जमिनीत कमीत कमी 8 ट्रॉल्या एकरी शेणखत सर्व जमिनीत पसरावे व नांगरट करावी. जमिन तापवून झाल्यानंतर नियोजित आकारानुसार सरी सोडून घ्यावी. उपलब्ध पाणी आणि जमिनीच्या प्रतीनुसार ठिबक संचाचे नियोजन करणे गरजेचे आहे.

**शेतकऱ्यांना रोपे पोहोच झालेनंतर बाहेरच्या वातावरणात किमान 4 ते 5 दिवस रोपांचे ट्रे ठेवावे. सकाळचे व संध्याकाळचे किमान 6 तास तरी डायरेक्ट ऊन (सुर्यप्रकाश) मिळेल अशा पध्दतीने ट्रे ठेवावे. (पत्र्याच्या शेडमध्ये किंवा स्लॅप खाली ट्रे ठेवू नये.)**

**या रोपांना दररोज सकाळी एकदा कोकोपीट मध्ये पूर्ण ओले हाईपर्यंत झारीने अथवा शॉवरने पाणी मारावे.**

व 19-19-19 = 4 gm / Lit + बायोझाईम = 2 ml / Lit एकत्र घेऊन पानावर फवारावे.

ज्या दिवशी रोपांचे लागण करायचे आहे त्या दिवशी पाणी मारु नये. लागणीचे वेळी ट्रे मधील कोकोपीट वाळणे गरजेचे आहे. कोकोपीट वाळल्याने रोपांचे कप चांगले निघतात. रोपांचे लागण झाल्यानंतर लगेच भरपूर पाणी देणे गरजेचे आहे.

रोप लावणीच्या आधी 6" खोलीचा खड्डा काढून त्यामध्ये प्रथम 2 ग्रॅम रिजेंट ग्रॅन्युअल टाकावे. नंतर 100 ग्रॅम लिंबोळी पेंड व त्यावर 200 ग्रॅम गांडूळ खत टाकावे. तिन्ही स्वतंत्र खड्ड्यामध्ये टाकावे. (मिक्स करु नये.)

**रोप लावतांना कोकोपीट व जमिनीची लेव्हल एक सारखी राहील याची काळजी घ्यावी. रोप लागणीनंतर लगेच पाणी द्यावे. रोपे सरीत खाली न लावता बोधाच्या एका बाजूस लावावे किंवा 4" उंचीचे बेड तयार करुन बेडवर लागवड करावे.**

✻ उन्हाळ्याच्या दिवसामध्ये लागणीनतर रोपांची पाने वाळू नयेत (डिहायड्रेशन मुळे) यासाठी ग्रीन मिरॅकल 2 मि.ली./लिटर प्रमाण घेवून रोपांच्या पानावर फवारणी करणे व गरजेनुसार तीन दिवसाच्या अंतराने परत फवारणी घेणे. केवोलीन, ताबा व इतर औषधेही चालतील.

### ✻ लागवडीचे अंतर :-

✻ हलक्या जमिनीत 6 x 5 फुट ✻ भारी जमिनीत 7 x 5 फुट

✻ पट्टा पध्दती 8 x 4 x 6 फुट अंतर ठेवावे.

✻ **शक्यतो 7' x 5' अंतर ठेवावे व प्रत्येक ओळीस डबल लॅटरल टाकावे.**

1) **पहिली आळवणी – रोप लागणीनंतर 3 दिवसांनी**

| | | |
|---|---|---|
| स्ट्रेप्टोसायक्लिन | – | 0.2 ग्रॅम/लिटर (3 ग्रॅम/15 लि. पंपास) |
| बावीस्टीन | – | 3 ग्रॅम/लिटर |

एकत्र घेऊन तयार झालेले द्रावण प्रत्येक झाडाच्या बुडक्यात 250 मि.ली. ओतणे.

2) **दुसरी आळवणी – रोप लागणीनंतर 7 दिवसांनी**

| | | |
|---|---|---|
| जर्मिनेटर | – | 4 मिली/लिटर |
| 12:61:00 | – | 10 ग्रॅम/लिटर |

एकत्र घेऊन तयार झालेले द्रावण जमिनीत ओल असताना प्रत्येक झाडाच्या बुडक्यात 250 मि.ली. ओतणे.

3) **पानांवर फवारणी – रोप लागणीनंतर 12 दिवसांनी**

| | | |
|---|---|---|
| 13:40:13 | – | 4 ग्रॅम/लिटर |
| बोरॉन | – | 1 ग्रॅम/लिटर |
| सिलीकॉन | – | 1 ग्रॅम/लिटर |

घेऊन सकाळी किंवा सायंकाळी पानावर फवारणी करावे. गरजेनुसार हीच फवारणी 4 दिवसांनी परत करावी.

## ✻ जिवामृताचा वापर :–

केळी पिकाला जिवामृताचा वापर खूप फायदेशीर ठरले आहे. म्हणून पावसाळ्यात 2 वेळा, थंडीत 2 वेळा व उन्हाळ्यात 1 वेळा जिवामृताचा वापर करावा.

## ✻ जिवामृत तयार करण्याची पध्दत :–

200 लिटर पाण्यात 10 किलो देशी गाईचे ताजे शेण + 5 लिटर देशी गाईचे गोमूत्र + 2 किलो काळा गुळ + 500 ग्रॅम बेसन पिठ + 1 मुठ बांधावरची माती यामध्ये मिक्स करणे. तयार झालेले द्रावण दररोज सकाळी व सायंकाळी काठीच्या सहाय्याने 10 मिनीटे क्लॉकवाईज फिरविणे व 2-3 दिवसांनी हे द्रावण एक एकर साठी आळवणी करणे. जिवामृताच्या वापरामुळे केळी झाडांची खूप निरोगी व सशक्त वाढ होते. आळवणी करतेवेळी यामध्ये अॅझोटोबॅक्टर, P.S.B., K.A.B., मेटॉरिझम, व्हर्टिसिलीयम, बिव्हेरिया इ. जिवाणूचा वापर करु शकता. अथवा या जीवाणूंचा वापर स्वतंत्रपणे करावा.

1) **मायक्रोरायझा 100 ग्रॅम + P.S.B. 250 मिली + 500 ग्रॅम गुळ 150 लि. पाण्यात मिक्स करुन प्रत्येक रोपांच्या बुडक्यात 100 मिली औषध लागणीनंतर 25 दिवसांनी व भरणीनंतर आळवणी करावे.**
2) **केळी पिकासाठी पोट्याशची गरज जास्त असल्याने K.A.B. (पोट्याश अॅव्हेलेबल बॅक्टेरियाचा वापर करावा.)**
3) **जमिनीतून द्यावयाच्या रासायनिक खताबरोबर ड्रिपमधून ही खते देणे गरजेचे आहे. प्रत्येक ओळीस डबल लॅटरल टाकावे.**

## विद्राव्य खताची मात्रा प्रती एकरी ड्रीपमधून देणेसाठी (प्रत्येकी 8 दिवसांनी)

| | Urea | 12:61:00 | S.O.P. | $MgSo_4$ |
|---|---|---|---|---|
| 10 ते 120 दिवस (14 डोस) | **3.5 Kg** | **2 Kg** | **5 Kg** | **2 Kg** |
| 121 ते 240 दिवस (15 डोस) | **7 Kg** | **1 Kg** | **8 Kg** | **2 Kg** |
| 241 ते 360 दिवस (15 डोस) | **1.5 Kg** | **0.5 Kg** | **8 Kg** | **2 Kg** |

* पहिला महिना, चौथा महिना आणि आठवा महिना या महिन्यामध्ये खालील सूक्ष्म अन्नद्रव्यांचे डोस ड्रीपमधून देणे आवश्यक आहे.
  $MnSO_4$ = 2 Kg + $Z_n SO_4$ = 4 Kg + Boron = 200 gm + $FeSo_4$ = 2 Kg + Silicon 500 gm
* रोप लागणीनंतर केळी घड बाहेर येऊ पर्यंत ड्रिपमधून एकरी कॅल्शीयम नायट्रेट 5 Kg प्रत्येकी 15 दिवसाला स्वतंत्रपणे देणे आवश्यक आहे.

### ✻ खालील वरखतांची मात्रा प्रती एकरी देणे.

1) **पहिला डोस – लागणीनंतर 15 दिवसांनी, झाडापासून 9 इंच अंतरावर दोन्ही बाजूस**
   - युरीया (निमकोटेड) – 25 किलो
   - सिंगल सुपर फॉस्फेट – 100 किलो
   - म्यु. पोटॅश (M.O.P.) – 50 किलो
   - मॅग्नेशिअम सल्फेट ($MgSO_4$) – 10 किलो

   $MnSO_4$ = 2 Kg + $Z_n SO_4$ = 4 Kg + Boron = 200 gm + $FeSo_4$ = 2 Kg + Silicon 500 gm

---

2) **दुसरा डोस – लागणीनंतर 45 दिवसांनी, झाडापासून 1 फूट अंतरावर**
   - युरीया (निमकोटेड) – 50 किलो
   - सिंगल सुपर फॉस्फेट – 50 किलो
   - म्यु. पोटॅश (M.O.P.) – 100 किलो
   - मॅग्नेशिअम सल्फेट ($MgSO_4$) – 25 किलो

---

3) **तिसरा डोस – लागणीनंतर 90 दिवसांनी (भरणीचे वेळी), झाडापासून** 1 **फूट अंतरावर दोन्ही बाजूस पसरुन टाकणे. एकरी 4 ट्रॉली शेणखत झाडापासून 1 फुट अंतर सोडून सरीमध्ये पसरुन टाकणे.**
   - युरीया (निमकोटेड) – 50 किलो
   - डी. ए. पी. – 25 किलो
   - म्यु. पोटॅश (M.O.P.) – 150 किलो
   - मॅग्नेशिअम सल्फेट ($MgSO_4$) – 25 किलो
   - लिंबोळी पेंड 50 किलो

   $MnSO_4$ = 5 Kg + $Z_n SO_4$ = 10 Kg + Boron = 1 Kg + $FeSo_4$ = 5 Kg + Silicon 500 gm

---

4) **चौथा डोस – लागणीनंतर 150 दिवसांनी, झाडापासून 1 ते 1.5 फूट अंतरावर**

- युरीया (निमकोटेड) – 25 किलो
- म्यु. पोटॅश (M.O.P.) – 50 किलो
- मॅग्नेशिअम सल्फेट ($MgSO_4$) – 10 किलो

5) **पाचवा डोस – लागणीनंतर 180 दिवसांनी, झाडापासून 1 ते 1.5 फूट अंतरावर**

- युरीया (निमकोटेड) – 25 किलो
- म्यु. पोटॅश (M.O.P.) – 50 किलो
- मॅग्नेशिअम सल्फेट ($MgSO_4$) – 10 किलो

**✻ महत्वाच्या सूचना :–**

1) जर झाडामध्ये पोटॅश या अन्नद्रव्याचे खूप कमतरता असेल तर 150 दिवस आणि 180 दिवसाच्या डोसमध्ये M.O.P. ऐवजी S.O.P. वापरल्यास पोटॅशचे अपटेक (उपलब्धता) लवकर होईल व हाच डोस परत 80% ते 90% केळफूल बोहर आल्यानंतर देऊ शकता.

2) 150 दिवसाच्या डोसमध्ये 25 किलो युरिया ऐवजी 50 किलो अमोनियम सल्फेट वापरल्यास पिकाची वाढ चांगली होईल.

3) रोप लागणीनंतर केळी घड बाहेर येऊ पर्यंत एकरी कॅल्शीयम नायट्रेट 5 Kg प्रत्येकी 15 दिवसाला स्वतंत्रपणे देणे आवश्यक आहे.

4) जिवामृत किंवा मायकोरायझाचा वापर आणि रासायनिक खते यामध्ये किमान 8 दिवसाचे अंतर ठेवावे.

5) जिवामृतमध्ये K.A.B. (पोट्याश अव्हेलेबल बॅक्टेरिया) चा वापर करावा.

**✻ सूचना :–**

✻ रोपांच्या वाढीच्या गरजेनुसार पाणी द्यावे. अति झाल्यास मुळ कुज येऊ शकते. ✻ अति पावसाच्या ठिकाणी नत्राचे प्रमाण कमी करावे. ✻ लिंबोळी पेंड व एरंडी पेंड चांगल्या प्रतीचे पाहून घ्यावे. ✻ हवामानानुसार पाण्याचे नियोजन करावे. ✻ केळी झाडावर सावली पडणार नाही अशा प्रकारे वारा प्रतिबंधक योजना करावी. ✻ **आमच्या मते केळी बागेत कोणतेही आंतरपिक घेऊ नये. ✻ टिश्युकल्चर केळी रोपांसाठी ड्रिप असणे अत्यंत गरजेचे आहे व ओळीच्या दोन्ही बाजूस डबल लॅटरल असणे अत्यंत गरजेचे आहे.**

**✻ टिप :–**

जमिनीचा पोत, त्या त्या परिसरातील हवामान, पाण्याचा सामू व प्रत्यक्ष शेतीमधील व्यवस्थापन या गोष्टीवर पिकाचा कालावधी व उत्पादन अवलंबून असते. आपआपल्या गरजेनुसार सर्व व्यवस्थापनात बदल करावा. या व्यतिरिक्त काही अडचण निर्माण झाल्यास वितरकाशी संपर्क करावा. माती परीक्षण व पाणी परीक्षण करुन त्याचा अहवालानुसार खताची मात्रा कमी अथवा जास्त होऊ शकते.

✻✻✻✻